PDF Compressor Free Version

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
10/2, स्टाकी टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440 001
दुरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

ई-मेलद्वारे

विषय:-महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३०/०८/२०२३ रोजी आयोजित १९ व्या सभेच्या कार्यवृत्तांता बाबत.

क्रमांक:व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.१२१(भाग-५)/२३-२४/ 592

नागपूर: ४४० ००१, दिनांक : 04/09/२०२३

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
४. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि.नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्रमांक:कक्ष-६/लले/व्यसं/कासंसभा/भाग-५/२३-२४/५५३
दिनांक २८/०८/२०२३

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची १९ वी सभा, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०८/२०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता "कमांड

PDF Compressor Free Version

कंट्रोल रूम", वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र:- वरील प्रमाणे.**

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर

**प्रतिलिपी:-**

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता सादर.
२) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
३) वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४) उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर

प्रत — कक्ष-२, योजना, मनिपविमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

PDF Compressor Free Version

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक ३०/०८/२०२३ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या १९ व्या सभेचा कार्यवृतांत**

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची १९ वी सभा दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली **कमांड कंट्रोल रूम,** वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्य व आंमत्रित अधिका यांची यादी (परिशिष्ट १) नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य सचिव यांनी **एकोणीसव्या सभेच्या** सुरुवातीला अध्यक्षांचे व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सभेमध्ये सर्व विषयांवर सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समितीद्वारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

सादरीकरण संबंधित उपवनसंरक्षक/ विभागीय वनाधिकारी यांनी केले.

सर्व मंजूर प्रस्तावांना पुढील सर्वसाधारण अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी प्रदान केलेली आहे.

(१) वन संवर्धन कायदा, १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७ व वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ चे कोठल्याहीप्रकारे उल्लंघन होणार नाही.

(२) महाराष्ट्र राज्य वन पर्यटन धोरण व वन पर्यटनासंबंधी वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेले शासन निर्णय/ सूचनांच्या विपरीत कामे करता येणार नाही.

(३) प्रत्यक्ष कामे ही मंजुर आराखड्यानुसारच होतील. कामाचे प्रकार किंवा स्वरुप किंवा नवीन कामे घ्यावयाची असल्यास सुधारीत आराखडा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडून मंजुर झालेनंतरच पुढील कार्यवाही करावी.

(४) प्राचीन ऐतिहासीक स्मारके उदा. गड/किल्ले आदी यांचेशी संबंधित निसर्ग पर्यटनाची कामे करण्यापूर्वी संबंधित पुरातत्व विभागाची परवानगी प्राप्त करावी. अशी कामे ऐतिहासीक स्मारकाशी समरस होणारी असावीत याकरीता आवश्यक तांत्रीक मार्गदर्शन त्यांचे कार्यालयातील तज्ञांकडून घ्यावे.

PDF Compressor Free Version

| विषय क्रमांक | विषय | समितीचे निर्णय |
|---|---|---|
| १ | दिनांक २७/०६/२०२३ रोजी झालेल्या १८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे. | यासंबंधी सविस्तर चर्चा होवून सर्वानुमते कार्यवृत्तांत कायम करण्यात आला. |
| २ | **निसर्ग पर्यटन विकास आराखडयांना मान्यता देणे.** | |
| २.१ | **संजय गांधी राष्ट्रीय उद्यान निसर्ग पर्यटन विकास आराखडा, बोरीवली वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.४३३२.८५ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.२ | **मौजे भरणेवाडी ता. इंदापूर फॉ. स. नं. १५३ निसर्ग पर्यटन आराखडा, पुणे वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.२३९.५० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.३ | **मौजे पिसोळी फॉ.स.नं.२६ निसर्ग पर्यटन विकास आराखडा, पुणे वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.२४३.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.४ | **मौजे वडकी राखीव वन गट नं.२७९, ३०९ निसर्ग पर्यटन विकास आराखडा, पुणे वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.३२८.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.५ | **मौजे वानवडी फॉ.स.नं.४९ वन उद्यान निसर्ग पर्यटन विकास आराखडा, पुणे वनविभाग**<br>आराखडा किंमत रु.४८९.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२३-२४ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |

**३) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालय परिसरातील लेबर शेड चे दुरुस्ती कामाबाबत.**

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालय परिसरातील लेबर शेड चे दुरुस्तीची कामे करण्याकरिता २९,४७७००/- रकमेच्या अंदाजपत्रकास वन अभियंता, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मान्यता प्रदान केली असून सदर कामे रु.२६४९०१९/- (without GST) मध्ये करण्याकरिता मंडळातर्फे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत सभेत माहिती देण्यात आली. समितीने सदर कामे करण्यास मान्यता प्रदान केली.

PDF Compressor Free Version

**४) ऑनलाईन सफारी बुकिंग प्रणाली करिता पुलिंग अकाऊंट कार्यान्वित करणे.**

राज्यातील सर्व वन्यजीव अभयारण्य/ व्याघ्र प्रकल्प/ Ecotourism sites करिता सर्वसामान्य पर्यटकांसाठी आवश्यक देय शुल्क जमा करणे करिता एकच पमेंट गेटवे प्लॅटफॉर्म असणे आवश्यक असून त्याकरिता वनविभागाचे अधिकृत पुलिंग खाते असणे गरजेचे आहे.

त्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे भारतीय स्टेट बँक, सिव्हील लाईन, नागपूर येथे नवीन पुलिंग खाते उघडण्यास परवानगी देणेबाबत शासनास विनंती केली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर या नांवाने भारतीय स्टेट बँक, सिव्हील लाईन, नागपूर येथे नवीन पुलिंग खाते Current Account राहील. सदर खाते व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ संचालीत करतील.
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ व स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये MoU होणार आहे. त्याद्वारे SBI ePay Life द्वारे विविध निसर्ग पर्यटन स्थळांचा सफारी/ निवास व्यवस्थेपोटी पर्यटकांद्वारे आरक्षणामुळे पुलिंग अकाऊंट मध्ये जमा होणारी रक्कम संबंधीत निसर्ग पर्यटन स्थळाच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती सभेत सादर करण्यात आली. त्यावर समितीने सदर कार्यवाहीस मान्यता प्रदान केली.

**५) निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे आर्किटेक्ट कंन्सलटंन्सी फर्म यांचे पॅनेलवर नियुक्तीबाबत.**

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर अंतर्गत करावयाचे पर्यटन विकास कामाकरीता आर्किटेक्ट कंन्सलटंन्सी फर्म यांचे पॅनेला शासन निर्णय दिनांक २२/०८/२०२३ अन्वये २३ वास्तुशास्त्र सल्लागारांची नियुक्ती करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. याबाबत सभेत माहिती देण्यात आली. त्यावर समितीने समाधान व्यक्त केले.

सभेच्या शेवटी व्यवस्थापकीय संचालक, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,**
**नागपूर**

PDF Compressor Free Version

## दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या १९ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समिती मधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वाय.एल.पी. राव | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| २ | श्री. महीप गुप्ता | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, तथा सदस्य सचिव, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| ३ | श्री. प्रविण चव्हाण | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर |
| ४ | श्री. राजन तलमले | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकेम्पा), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे प्रतिनिधी |
| ५ | श्री. राजेश तिवारी | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सि.एम., नागपूर यांचे प्रतिनिधी |
| ६ | श्रीमती प्रतिभा बोदेले | | महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे प्रतिनिधी |
| **आभासी V.C. व्दारे सभेस उपस्थितांची यादी** | | | |
| १ | डॉ. व्ही. क्लेमेंट बेन | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई |
| २ | श्री. एन. आर. प्रविण | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे |
| ३ | श्री. जी. मल्लीकार्जुन | | वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली |
| ४ | श्री. महादेव मोहिते | | उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग |
| ५ | श्रीमती प्रत्युषा | | SDGM |
| ६ | श्री. के. व्यंकटेश | | Additional GM |
| ७ | श्री. नरेन्द्र चांदेवार | | उप महाप्रबंधक, मनिपविमं. नागपूर |